# सापळा केस

दिनांक ६/११/२०२०

**आरोपी मदन नरहरराव चोपडे, वय ५० वर्षे, व्यवसाय खाजगी सहायक, रा.मांडवा ता.जि.परभणी (खाजगी ईसम) यांनी ७,०००/— रू मागणी केल्याची यशस्वी लाच मागणी कारवाई**

यातील तक्रारदार यांनी अे.सी.बी.कार्यालय परभणी येथे दि. ०५.११.२०२० रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, तक्रारदार यांचा भावांचे नावावर कारेगाव हद्दीत रिकामा प्लॉट आहे. सदर प्लॉटचे फेरफारचे काम करणेसाठी तलाठी सज्जा कारेगाव यांचेकडे संपुर्ण संचीका नियमानुसार तयार करून दाखल केली आहे.परंतु अद्याप पावेतो सदर प्लॉटचे फेरफारचे काम न झालेने ते तलाठी मॅडम यांना भेटण्यासाठी दि. ०४/११/२०२० रोजी त्यांचे खाजगी कार्यालयात गेले असता तलाठी मॅडमचे मदतनिस श्री.चोपडे यांनी त्यांचा फेरफारचे कामासाठी लाचेची मागणी केली. परंतु सदर कामासाठी श्री.चोपडे यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नव्हती. जर तक्रदार यांनी त्यांना पैसे दिले नाही तर ते फेरफारचे काम करून देणार नाहीत या भितीने त्यांना नाईलाजास्तव होकार देवून दि.०५/११/२०२० रोजी अे.सी.बी. कार्यालय परभणी येथे तक्रार देण्यासाठी आले. त्यांनी स्वत: अगर ईतरांमार्फत लाच मागणी करून लाचेची रक्कम स्विकारल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक ०५/११/२०२० रोजी आरोपी चोपडे (खाजगी ईसम) यांनी तक्रारदार यांचे फेरफारचे कामासाठी ७,०००/— रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि. ०६/११/२०२० रोजी घेवून येण्याचे सांगीतले. त्याप्रमाणे दि. ०६/११/२०२० रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यावाहीमध्ये आरोपी चोपडे (खाजगी ईसम) यांनी नमुद लाचेची रक्कम रू.७०००/— तक्रारदार यांचेडुन स्विकारली आहे. आरोपी मदन नरहरराव चोपडे, वय ५० वर्षे, रा.मांडवा ता.जि.परभणी यांचे विरूध्द पो.स्टे नानलपेठ येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोह/हनुमंते, पोह/शेख शकील, पोना/शेख मुखीद,मपोशि/टेहरे, मपोशि/दंडवते, चापोह/चौधरी, अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक ०२४५२—२२०५९७**

**टोल फ्री कमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक, ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — मो.नं. ८८८८८४१९६५

श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — मो.नं. ९६६५४७९३३३

श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी — मो.नं. ७०२१००२११०

श्री.अमोल कडु, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी — मो.नं. ८०८७०७२९१९

Scanned with CamScanner